ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख २ मे, १९५१ अंक १८

दि

## बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.,

पुणें २.

नवीन एक हजार टनांच्या मशिनरीची उभारणी लवकरच पूर्ण होईल व पुढील हंगामापासून नवीन मशिनरीनें साखर होईल.

हल्लीं चालू असलेली स्कोडा कंपनीची मशिनरी डायरेक्टरांची परवानगी घेऊन हंगाम संपल्यावर विकावयाची आहे. ज्यांना मशिनरी घेण्याची असेल त्यांनीं परवानगी घेऊन चालू स्थितींत मशिनरी पाहून किती लक्ष रुपये किंमत देणार तें कळवावें.

पुणें,
ता. २१ एप्रिल १९५१.
कॉमनवेल्थ बिल्डिंग,
९८० सदाशिव, लक्ष्मीरोड,
पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.
सी. जी. आगाशे ॲण्ड को.
मॅनेजिंग एजंट्स

खालील कंपन्यांचा माल आमचेकडे
घाऊक व किरकोळ मिळतो.
या मालाची यादी मागवा.
म्हैसूर किर्लोस्कर लि. ............ किर्लोस्कर बंधु, लि.
किर्लोस्कर इलेक्ट्रिक कं....किर्लोस्कर ऑईल एंजीन्स लि.
ओगले ग्लास वर्क्स लि. ............शिवाजी वर्क्स लि.
जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लि. ... बेळगांव मोटार्स
पॅरी आणि कं. लि.
केळकर बंधु, लक्ष्मीरोड, पुणें २

## विविध माहिती

**सामाजिक नीतीचा ऱ्हास**—१९४९ सालीं ब्रिटनमध्यें २७,०७४ बेकायदा मुलें जन्मास आलीं. प्रत्येक २० कायदेशीर मुलांत १ बेकायदा असें हें प्रमाण पडतें. बेकायदेशीर जन्म झालेल्या मुलांना सामाजिक दृष्ट्या कांहीं गैरसोयी सोसाव्या लागत नाहींत, तरी सुद्धां १,००० बेकायदेशीर मुलांपैकीं ४५ मुलें दरवर्षी दगावतात. कायदेशीर मुलांच्या मृत्यूचें प्रमाण दरवर्षी दर हजारीं ३२ आहे.

**दिल्लींत रिक्षांना बंदी**—हातानें ओढल्या जाणाऱ्या रिक्षांना दिल्ली म्युनिसिपालिटीनें आपल्या हद्दींत बंदी केली आहे. ह्या हुकमामुळें १७४ रिक्षावाल्यांना स्वस्थ बसावें लागणार आहे. १९४८ सालापासून हातरिक्षांना हळूहळू बंदी करण्यांत येऊं लागली. १९४८ सालीं १०६ रिक्षावाल्यांचे परवाने रद्द करण्यांत आले. १९४९–५०सालीं ८८ व १९५०–१९५१ सालीं १३२ परवाने रद्द करण्यांत आले.

**रशिआंतील उद्योगधंद्यांचें स्थलांतर**—रशिआनें लष्करी-दृष्ट्या महत्त्वाचे असलेले आपले बहुतेक उद्योगधंदे उरल पर्वत, मध्य आशिआ आणि सैबिरिआ येथें हलवले आहेत असें समजतें. तेल, पोलाद व कोळसा ह्या तीन मूलभूत वस्तूंच्या रशिआच्या एकूण उत्पादनापैकीं निम्में उत्पादन आतां युरोपच्या सरहद्दीपासून हजारों मैल दूर अशा ठिकाणीं होईल.

**योग विद्येचें कॉलेज**—कैवल्यधाम श्रीमद् माधव योगमंदिर समितीच्या विद्यमानें लोणावळा येथें योगविद्येच्या कॉलेजचें उद्घाटन मुंबई राज्याचे मुख्य प्रधान श्री. बाळासाहेब खेर ह्यांचे हस्तें झालें. कॉलेजचें नांव ‘ गोवर्धनदास सेकसारिआ कॉलेज ’ असें ठेवण्यांत आलें आहे. ह्याप्रसंगीं १४०० वर्षांपूर्वीच्या “ बृहद्‌योगी-याज्ञवल्क्य स्मृति ” ह्या प्राचीन ग्रंथाचें प्रकाशनहि झालें.

**परकीय सरकारनें मालमत्ता घेतल्यास**—परदेशांतील अमेरिकन नागरिकांची मालमत्ता त्या देशाच्या सरकारनें ताब्यांत घेतल्यास तिचा विमा उतरून ठेवण्याची तयारी अमेरिकन सरकारनें दाखविली आहे. परदेशांशीं स्नेहभावाचे संबंध ठेवण्यास मदत व्हावी म्हणून इकॉनॉमिक कोऑपरेशन अॅडमिनिस्ट्रेशननें ही योजना आखली आहे. मार्शल मदत मिळणाऱ्या देशांत क्रांतीनें अगर लष्करी पराभवानें अशी मालमत्ता हुकूमशाही राष्ट्राच्या ताब्यांत गेल्यासच विमा लागू होईल. युद्ध अगर मामुली व्यापार ह्यांची जोखीम मात्र पत्करण्यांत येणार नाहीं.

## वयांत न आलेल्याच्या विवाहासाठीं काढलेलें कर्ज

### कॉन्ट्रॅक्ट अॅक्टाप्रमाणें बेकायदा

“ एकाद्या पालकानें किंवा मॅनेजरानें, १९२९ च्या चाइल्ड मॅरेज रिस्ट्रेन्ट कायद्याच्या ( शारदा कायद्याच्या ) तरतुदींविरुद्ध अल्पवयी मुलाच्या किंवा मुलीच्या विवाहासाठीं प्रॉमिसरी नोटीवर कर्ज काढलें, तर तें कायदेशीर नसल्यानें त्याची वसुली करून मागतां येणार नाहीं. ” असा मद्रास हायकोर्टाचा १७ एप्रिल, १९५१ चा निवाडा आहे. “ अशा तऱ्हेच्या कर्जास कायदेशीर ठरवलें तर शारदा कायद्याच्या तरतुदीस तें बाधक होईल. विधि-मंडळानें प्रगतिपर लोकमतास अनुसरून शारदा कायदा मंजूर केला. सध्यांच्या सामाजिक परिस्थितींत, अल्पवयी मुलाचें किंवा मुलीचें पालकानें लग्न लावून देणें सार्वजनिक यथा–योग्य धोरणाशीं विसंगत आहे. म्हणून असें कर्ज कॉन्ट्रॅक्ट अॅक्टाच्या २३ व्या कलमाप्रमाणें बेकायदा ठरतें आणि म्हणून कर्जवसुलीस कोर्टें मदत करूं शकणार नाहींत. ” असा हायकोर्टाचा अभिप्राय आहे.

मसुलिपट्टम येथील कोर्टाच्या निवाड्यावर हायकोर्टांत अपील करण्यांत आलें होतें, परंतु हायकोर्टानें खालच्या कोर्टाचा निर्णयच उचलून धरला.

## स्टॉक एक्सचेंजच्या यादींत नसलेल्या शेअर्सचा प्रश्न

### शेअर ब्रोकर्सना ताकीद

नेटिव्ह शेअर अँड स्टॉक ब्रोकर्स असोसिएशनच्या ( मुंबई स्टॉक एक्सचेंजच्या ) सभासदांनीं, जे शेअर्स स्टॉक एक्सचेंजच्या अधिकृत यादींत आहेत किंवा जे शेअर्स भारतांतील इतर ठिकाणच्या शेअर बाजारांचे यादींत आहेत ( फॉरिन सिक्युरिटीज् ), अशाच शेअर्सची खरेदी–विक्री करण्यास हरकत नाहीं. बर्मा कॉर्पोरेशनचे व हिंदुस्थान मोटर्सचे शेअर्स फॉरिन सिक्युरिटीजच्या सदरांत येतात. किलिक इंडस्ट्रीज, प्रीमिअर ऑटोमोबाइल्स, गोल्ड मोहोर मिल्स आणि मुंबई प्रां. सहकारी बँक ह्यांचे शेअर्स मुंबई स्टॉक एक्सचेंजच्या अधिकृत यादींत समाविष्ट नाहींत, किंवा भारतांतील इतर स्टॉक एक्सचेंजेसच्या यादींतहि नाहींत. म्हणून, मुंबई स्टॉक एक्सचेंजचे सभासद आपल्या गिऱ्हाइकांसाठी जीं सर्क्युलरें किंवा अहवाल काढतात, त्यांत ह्या कंपन्यांच्या शेअर्सच्या किंमती देण्यांत येता कामा नयेत, अशी ताकीद मुंबई स्टॉक एक्सचेंजनें आपल्या सभासदांना दिली आहे.

**सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँक लि., सोलापूर**

ही बँक २० मार्च, १९४९ रोजीं स्थापन झाली. बँकेचें मुख्य उद्दिष्ट ग्रामीण विभागांत लहान प्रमाणावर व घरगुती उद्योगधंदे करणाऱ्यां कारागिरांना व सहकारी सोसायट्यांना आर्थिक सहाय्य पुरविणें हा आहे. भाग भांडवल रु. ४९,००० असून त्यापैकीं सोलापूर हातमाग असामी सहकारी संघ व सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी संघ यांनीं अनुक्रमें १०,००० व ५,१०० रु. चे भाग खरीदले आहेत. १९४९–५० सालीं बँकेस रु. ३,७७२ तोटा झाला आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती–गरम–रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. १ मे, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## लोकसंख्येच्या प्रश्नाकडे आर्थिक दृष्टीनें पहा

खानेसुमारीबद्दलच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अंदाजावरून असें दिसून येतें कीं १९४१ ते ५१ च्या दरम्यान हिंदच्या लोकसंख्येंत साडेचार कोटींनीं म्हणजे १३ टक्क्यांनीं वाढ झाली आहे. गेल्या दहा वर्षांतील लोकसंख्येंतील ही वाढ निःसंशय चिंतनीय आहे. हिंदची लोकसंख्या विशेषतः १९२० नंतरच्या गेल्या ३० वर्षांत विशेष वाढली आहे. लोकसंख्येच्या वाढीच्या प्रश्नाचा विचार अन्नपुरवठ्याच्या परिस्थितीच्या दृष्टीनें केला पाहिजे. कारण, लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणांत धान्याच्या उत्पादनाची व इतर उत्पादनाची परिस्थिति सुधारलेली नाहीं. गेल्या ३० वर्षांत लोकसंख्या ज्या प्रमाणांत वाढत आहे तें वाढीचें प्रमाण कायम राहिल्यास १९७० सालीं हिंदची लोकसंख्या ४६ कोटी होईल. या अंदाजी आंकड्यावरून धान्याचें उत्पादन वाढविणें व त्याचबरोबर वाढत्या लोकसंख्येला आळा घालणें या दोनहि गोष्टींवर भर दिला पाहिजे, हें दिसून येतें.

हिंदमध्यें आज निदान सुशिक्षित लोकांचें लक्ष वाढत्या लोकसंख्येच्या प्रश्नाकडे वळलें आहे ही किंचित् आशाजनक गोष्ट आहे. परंतु अशा रीतीनें विचार करणाऱ्या लोकांची संख्या फार तर शेंकडा पांच असूं शकेल, व हे लोक श्रीमंत व मध्यम वर्गांतील आहेत. वास्तविक या बाबतींत अशी गोष्ट आहे कीं लोकसंख्येच्या वाढीच्या प्रश्नाचा विचार खालच्या म्हटल्या जाणाऱ्या वर्गांतील लोकांनीं म्हणजे सर्वसाधारण कारखान्यांत व बैठ्या उद्योगधंद्यांत काम करणारांनीं व शेतकरीवर्गानें केला पाहिजे. परंतु सर्वसाधारण अज्ञानामुळें या वर्गांपैकीं कोणाचेंहि या महत्त्वाच्या प्रश्नाकडे लक्ष गेलेलें नाहीं. कांहीं दिवसांपूर्वी मुंबई येथें प्रोग्रेसिव्ह ग्रूपतर्फे आजच्या परिस्थितीबद्दल केलेल्या भाषणांत डॉ. एस्. जी. पाणंदीकर यांनीं लोकसंख्या मर्यादित ठेवण्याच्या प्रश्नाला अग्रहक्क मिळाला पाहिजे व दीर्घकालीन योजनांपैकीं हा एक प्रश्न आहे या शब्दांत या विषयाचा उल्लेख केला. प्लॅनिंग कमिशननेंहि या प्रश्नाचा विचार करण्याची वेळ आली आहे.

कुटुंब व कुटुंबाचा विस्तार या गोष्टींकडे केवळ धार्मिक वृत्तीनें पाहाण्याची दृष्टि आपल्या देशांत पुरातन कालापासून निर्माण झाली आहे. परंतु आज लोकसंख्येची वाढ इतकी बेसुमार झाली आहे कीं कुटुंब-विस्ताराच्या प्रश्नाकडे आर्थिक दृष्टिकोनांतून पाहाण्याची वेळ निश्चित आली आहे. सहासात मुलें असण्यापेक्षां दोनतीनच मुलें असलीं तर त्यांचें शिक्षण व जोपासना या गोष्टींकडे विशेष लक्ष पुरवितां येतें. मुलें ही राष्ट्राची संपत्ति आहे; परंतु या संपत्तीला उपयुक्त बनविण्यासाठीं वयाच्या विसाव्या वर्षापर्यंत बराच खर्च करावा लागतो. या गोष्टींकडे लक्ष देऊनच कुटुंबांतील मुलांची संख्या ऐपतीप्रमाणें मर्यादित ठेवण्याकडे लक्ष दिलें पाहिजे. या महत्त्वाच्या बाबतींत बहुजन समाजानें दुर्लक्ष केलें तर त्याचे दुष्परिणाम भावी पिढीला आर्थिक दृष्टीनें सहन करावे लागतील. तरी या सामाजिक व आर्थिक प्रश्नाकडे सरकार, म्युनिसिपालिटया व जिल्हाबोर्डें व इतर सार्वजनिक संस्था या सर्वांनीं तातडीनें लक्ष दिलें पाहिजे.

---

## अमेरिकन अर्थव्यवस्थेचें स्वरूप 'भांडवलशाही' नाहीं?

'धिस वीक' ह्या प्रमुख अमेरिकन साप्ताहिकाचे संपादक मि. विल्यम निकोल्स ह्यांनीं नुकतेंच असें मत प्रदर्शित केलें आहे कीं, अमेरिकन अर्थव्यवस्था आतां भांडवलशाही स्वरूपाची राहिलेली नाहीं. भांडवलशाही अर्थव्यवस्थेचें मुख्य लक्षण म्हणजे उत्पादन-साधनावर असलेली व्यक्तिगत मालकी. ही मालकी अमेरिकेंत नष्ट करण्यांत आलेली नाहीं. तेव्हां ह्या व्याख्येप्रमाणें अमेरिकन अर्थव्यवस्था भांडवलशाहीच आहे असें म्हणतां येईल. मि. वीक्स आणखी असें म्हणतात कीं, "भांडवलशाही शब्दानें १९ व्या शतकांतील प्राथमिक अवस्थेंतील अर्थव्यवस्था, लोभी मालकवर्ग आणि जुलमाखाली पिचलेला कामगारवर्ग ह्यांचीच आठवण बहुतेकांना होते. वेतनवाढ, कामाच्या वेळांत कपात, उपभोग्य वस्तूंचे कमी भाव, बोनस, नफा-वांटणी, इत्यादि प्रकारांनीं अमेरिकेंत अधिकाधिक जनतेला उत्पादनाचा वांटा देण्याचा प्रयत्न करण्यांत येत असतो." मि. निकोल्स ह्यांनीं प्रचलित अमेरिकन अर्थव्यवस्थेचें जें वर्णन केलें आहे तें वस्तुस्थिति-निदर्शक आहे असें मानलें तरी ती भांडवलशाही अर्थव्यवस्था कशी नाहीं हें समजणें कठीण आहे. फार तर असें म्हणतां येईल कीं अमेरिकन भांडवलशाही इतर देशांतील भांडवलशाहीपेक्षां अधिक प्रगतिशील आहे; आणि अमेरिकन अर्थव्यवस्थेचें समर्थन करण्यासाठी त्या तज्ज्ञांचें म्हणणें असेंच आहे. भांडवलशाहींत आढळून येणारे दोष अमेरिकन अर्थव्यवस्थेंत कमी प्रमाणांत सांपडतात आणि ती अधिक विकासक्षम असल्यानें भांडवलशाहीच्या आर्थिक नियमांना अपवादभूत आहे असें त्यांचें म्हणणें आहे.

अर्थव्यवस्थेच्या स्वरूपाची तात्त्विक चर्चा सोडून प्रत्यक्ष वस्तुस्थितीकडे वळलें तरीहि मि. निकोल्स ह्यांचें म्हणणें टिकण्यासारखें नाहीं. १९५१ च्या जानेवारी २६ पासून अमेरिकेंत किंमती आणि वेतनें ह्यांच्यावर नियंत्रणें बसविण्यांत आलीं. तरीहि रहाणीच्या खर्चाचा निर्देशांक वाढतच आहे. ह्या वाढलेल्या खर्चाची तोंडमिळवणी करतां करतां गरीब मध्यमवर्ग, ठराविक पगार मिळणारे लोक आणि बचतीवर रहाणारे लोक ह्यांची त्रेधा उडूं लागली आहे. व्यापार-धंदा करणारे आणि उद्योगपती अधिक नफा मिळवूं लागले आहेत. रहाणीचा खर्च व वेतन ह्यांचा संबंध लक्षांत घेऊन कामगारांचें वेतन ठरविण्यांत येत असल्यामुळें, कामगारांचें बरें चाललें आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीय कुटुंबाला लागणाऱ्या वस्तूंच्या किंमतींत कशी वाढ झाली आहे ती पुढील कांहीं आंकड्यांवरून दिसून येते. साधारण प्रतीच्या लोकरीच्या सूटची किंमत २८८ रु. झाली आहे बुटाच्या जोडीची किंमत ५० रुपये; स्वस्तांत स्वस्त शर्टची

किंमत १५ रु. ८ आणे; तांदूळ १ पौंडाला १ रुपया; लोणी १ पौंडाला ४ रुपये. जीवनाला लागणाऱ्या इतर वस्तूंच्या किंमतीहि अशाच भडकत चालल्या आहेत. ह्या वाढत्या महागाईचें कारण म्हणजे अमेरिकन सरकारचा शस्त्रवाढीचा आणि कच्च्या मालाचे सांठे करण्याचा कार्यक्रम.

अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेचे परिणाम त्या देशापुरतेच मर्यादित राहिलेले नाहींत. ब्रिटनच्या मंत्रिमंडळांतील मि. बेव्हन, मि. विल्सन इत्यादि मंत्र्यांनीं नुकतेच जे राजीनामे दिले, त्यांचा उगमहि अमेरिकेच्या साठेबाजीच्या धोरणांतच आहे. अमेरिकेनें कच्च्या मालाच्या वांटणींत ब्रिटनला योग्य तो वांटा दिला नाहीं आणि आपलें रहाणीचें मान कमी केलें नाहीं तर ब्रिटिश कारखाने बंद पडल्याशिवाय रहाणार नाहींत असा इशाराहि देण्यांत आला आहे. ब्रिटनची शस्त्रास्त्र वाढ व सामाजिक सुखसोयी ह्यांच्यांत उत्पन्न झालेला आर्थिक विरोध लक्षांत घेतां, भारतासारख्या गरीब देशाला सामाजिक सुखसोयींची तरतूद करणें, अशक्यच नसलें तरी फार कठीण आहे असें वांटल्यावांचून राहात नाहीं.

### श्री. जोग ह्यांचा डेक्कन बँक्स असोसिएशनतर्फे सत्कार

महाराष्ट्र बँकेचे मॅनेजर श्री. चिं. वि. जोग हे इंग्लंडला बँकेतर्फे जात आहेत. त्यांचा दि डेक्कन बँक्स असोसिएशननें ता. २७ रोजीं सन्मान केला. त्यावेळीं असोसिएशनचे अध्यक्ष, श्री. प्रो. कृ. सांठे म्हणाले, "तरुणपणीं बँकिंगचा अभ्यास करून नंतर प्रत्यक्ष अनुभव भारतांत पुरेपूर मिळविल्यावर श्री. जोग हे परदेशांत जात आहेत, ही फार चांगली गोष्ट आहे. कारण त्यामुळें थोड्या वेळांत त्यांना तेथील, बँकिंगचीं वैशिष्ट्यें उत्कृष्ट रीतीनें ग्रहण करतां येऊन आपल्या बँकिंगला त्याचा फायदा देतां येईल. बँकेचा मॅनेजर हुशार, तत्पर परंतु शांत प्रवृत्तीचा असावा लागतो. बाहेरील जगांतील उचापतीपासून त्यानें अलिप्त रहावें लागतें. श्री. जोग हे अशा गुणांनीं युक्त असल्यानें त्यांच्या नव्या अनुभवाचा फायदा महाराष्ट्रीय बँकिंगला व बँकर्सना चांगला उपकारक होईल." सभेंत श्री. सांठे (प्रेसिडेन्सी इं. बँकेचे चेअरमन), श्री. गांडेकर (न्यू सिटिझनचे मॅनेजर), श्री. क्षीरसागर (भारत इं. चे मॅ. डायरेक्टर), श्री. शिंगरे (भोर स्टेट बँकेचे चअरमन), श्री. रवडे (पुणें सें. को. चे मॅ. डायरेक्टर), इत्यादींचीं भाषणें झाल्यावर श्री. जोग ह्यांनीं योग्य शब्दांत आभार मानले.

### बेळगांव बँक्स असोसिएशनची स्थापना

रविवार ता. २२ एप्रिल रोजीं बेळगांव येथील बँक ऑफ सिटिझन्स लि. च्या कार्यालयांत स्थानिक बँकांच्या प्रतिनिधींची बैठक भरली होती. आरंभीं दि बँक ऑफ सिटिझन्स लि. चे डायरेक्टर श्री. जी. डी. सराफ ह्यांच्या भाषणानंतर 'बेळगांव बँक्स असोसिएशन' नांवाची संस्था स्थापन करण्याचा ठराव पास होऊन श्री. जी. डी. सराफ, श्री. जो. व्ही. सराफ, श्री. एस्. के. सामंत, श्री. वसंतराव याळगी व श्री एन्. के. देशपांडे अशा पांच जणांची तात्पुरती समिति नेमण्यांत आली. या समितीनें एक महिन्याच्या अवधींत संस्थेची घटना तयार करून त्यासंबंधीं अहवाल सादर करावा असा ठराव पास झाला.

बँक ऑफ सिटिझन्सचे डायरेक्टर श्री. जी. डी सराफ व जनरल मॅनेजर श्री. व्ही. एम्. पाटकर यांनीं ह्या कामीं विशेष मेहेनत घेतली, असें समजतें.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,५०० |

बोर्ड ऑफ डॉयरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. दृ. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. वा. ग. धंदुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. (ऑ.)
मॅनेजर.



फोन: ३४५११ तार: SAHYOG

# दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या (प्रोड्यूसर्स) सोसायट्यांना
असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करते:—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं,
कातडीं कमाविण्यास लागणारा माल,
कमावलेलें कातडें, इ., मशीन-
टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करते:—

हातमागावरील कापड (सुती व लोंकरी), धातुचें
सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती
आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व
कातडी माल, साथ तेलें, लाकूड आणि
कोळसा वगैरे.

## भिषि पद्धति किंवा डेली सेव्हिंग्ज पद्धति

### बचतीच्या प्रयत्नांस पोषक योजना

( लेखकः—श्री. ल. म. जोशी, बी. कॉम., सर्टि. ए. आय. बी. ( लंडन ), सर्टि. ए आय. आय. बी. ( मुंबई )

बँकांच्या दृष्टीनें सध्याची परिस्थिति फारच बिकट आहे. दिवसेंदिवस महागाईचें प्रमाण वाढत आहे. येत्या बजेटमध्यें नवीन करांची योजना आहेच. यामुळें मध्यम वर्गाजवळ बँकेंत ठेवीच्या रूपानें ठेवण्यासारखी शिल्लक दिवसेंदिवस कमी कमी होत चालली आहे. याचें प्रत्यंतर म्हणजे दररोज चालूं व सेव्हिंग खात्यावरील ठेवी कमी कमी होत आहेत. बऱ्याच कारणांमुळें बाजारांत खेळता पैसा फार नसल्यामुळें व्यापाऱ्यांस नाण्याची तंगी फार भासत आहे. म्हणून त्याजजवळहि ठेव ठेवण्याजोगा पैसा फार नसतो. रहातां राहिला गरीब व शेतकरी वर्ग. या लोकांस मागील लढाईपासून पैसा बरा मिळत असला तरी वाढत्या भावांत त्यांस सर्व जरूरीच्या वस्तू खरेदी कराव्या लागत असल्यामुळें व कांहीं शिल्लक राहिलीच तर चैनीचा मोह होत असल्यामुळें पुन्हां हातांत असा पैसा फारच थोडा रहातो. अशा परिस्थितींत सरकारनं काढलेल्या बचतीच्या योजना किती जरी निघाल्या तरी त्यांचें स्वागत मोठ्या हौसेनें होत नाहीं हें आपण पहातच आहोंत.

यावरून एक गोष्ट तरी स्पष्ट होतें कीं, प्रत्येक इसमास स्वतः भेटून, त्यास या बचतीच्या योजनेचें महत्त्व पटवून सांगणें. त्याच्याकडून जवळजवळ सक्तीच्या खुषीनें पैसे ठेव म्हणून घ्यावयाचे. असें केल्याशिवाय ही कल्पना मूळ धरणार नाहीं व फोंफावणारही नाहा. वरील गोष्टीचा सुंदर मिलाफ " भिषि " अगर " डली सेव्हिंग्ज " पद्धतींत दिसून येत असल्यामुळें या पद्धतीचा शक्य तितक्या जास्त बँकांनीं आपल्या व्यवहारांत अवलंब करण्याचा प्रयत्न करावा.

### " भिषि पद्धति " म्हणजे काय ?

या पद्धतीखालीं जे कोणी बँकेचे खातेदार झाले असतील त्यांनीं आपल्या खात्यांत दररोज कांहींतरी पैसा ( कमींत कमी एक आणा अगर चार आणे व पुढें कितीही ) भरला पाहिजे. ज्या पद्धतींत अशी बचत हाते त्यास भिषि पद्धति अगर डेली सेव्हिंग्ज पद्धति म्हणावयाचें. दररोज सायंकाळी ५॥ नंतर बँकेचे सायकलस्वार शिपाई नेमून दिलेल्या खातेदारांकडे जाऊन त्यांच्याकडून पैसे जमवून आणतात व आणखीही नवीन खातेदार जमा करतात.

### हिशेब ठेवण्याची पद्धति

खातें चालूं करावयाचें म्हटलें कीं, होऊं घातलेल्या खातेदारास एक वही देण्यांत येते. बँकेचें पासबुक देण्यांत येतें व त्यावर त्याची सही घेतात. पैसे गोळा करणाऱ्या शिपायाजवळ त्याच्या हद्दींतील खातेदारांचीं नांवें असतात. खातें उघडलें कीं जेवढ्या पैशानें उघडलें असेल ( एक आणा, चार आणे अगर १ रुपया कांहीही ) तेवढ्या पैशांची नोंद खातेदाराच्या वहींत हा सायकलस्वार करून सही करून वही खातेदाराजवळ देतो व त्याचवेळीं आपल्या स्वतःच्या वहींतही ही नोंद करतो. सायंकाळीं सगळीकडचे पैसे गोळा करून झाले कीं तो शिपाई अगर क्लार्क सगळे पैसे त्यांच्या नोंदीसह बँकेंत कॅशिअरच्या हवाली करतो. कॅशिअर आपल्या लेजरवर सर्व नोंदी करून कॅशचा मेळ बसवून पैसे घेतो व अशा तऱ्हेनें बँकेंत नोंदीसह कॅश दररोज जमा केली जाते.

### पैसे काढतां येतात

जसे पैसे एक आण्यापासून घेतात तसेंच दुसऱ्या दिवशीं सकाळीं एक आण्यापासून लगेच काढतां येतात. कमींत कमी मात्र चार आणे तरी ठेवावे लागतात. पैसे काढतांना बँकेंत खातेदारास दिलेलें पासबुक आणावेंच लागतें. यामुळें तिथल्यांतिथेंच त्याची पासबुकावर त्यानें केलेली सही पाहून त्याच्या बुकांत काढलेल्या पैशांचीं नोंद करून, ती आपल्या लेजर बुकाशीं जुळते आहे असें पाहून खातेदारास पैसे काढून देणें सुलभ जातें व पैशांच्या नोंदी तेथल्या तेथेंच वेळेवर होतात.

### इतर कांहीं माहिती

ह्या खात्यावर कांहींही व्याज दिलें जात नाहीं. कांहीं लोक स्वतः दररोज माणूस पाठवून पैसे भरतात, तर इतरांच्याकडे जाऊन पैसे रोज गोळा करावे लागतात. जे पैसे स्वतः भरतात त्यांना कांहीं चार्ज नाहीं; पण ज्यांच्याकडून रोज जाऊन पैसे आणावे लागतात त्यांच्याकडून मात्र महिन्याकांठीं मामुली चार्ज घेण्यांत येतो. यांतूनच पैसे गोळा करणाऱ्या शिपायाचा अगर क्लार्कचा खर्च भागवावयाची व्यवस्था थोड्या तरी अंशानें होऊं शकते.

### फायदे

हॉटेलवाले मालक आपल्या प्रत्येक नोकरांच्या नांवें त्याचा दिवसाचा पगार या पद्धतीखालीं देऊं शकेल. विडी वळणारीं माणसें, इतर बारीक सारीक कारखान्यांतून कामें करणारीं माणसें चटकन एकाच ठिकाणीं सांपडतात. मालकांस भेटून व समजावून सांगून ही अशी व्यवस्था करतां येईल. यामुळें त्यांचे पगारांतील थोडे तरी पैसे सक्तीनें वांचतील. लहानशीच रकम असल्याकारणानें कोणावर ताणही पडणार नाहीं व पैसा मुळींच न काढल्यास कांहीं दिवसांच्या अगर महिन्याच्या शेवटीं आश्चर्यकारक अशी बरीच बचत झाली असें प्रत्येकाच्या नजरेस येईल. यांतूनच विम्याचा हप्ता अगर मुलांच्या शाळांच्या फी अगर बुकें याकरितां लागणारा खर्च करतां येईल. बँकच्या दृष्टीनें फायदा असा कीं जास्त माणसांशीं संबंध येतात. दररोज बँकेचा माणूस तेथें जात असल्यामुळें ती बँक डोळ्यासमोर असते. तिच्यासंबंधीं आपुलकी निर्माण होते. सेवा चांगली केल्यास खातेदार एकमेकांना सांगून आपणांस आणखी खातेदार मिळवून देतात. खातीं वाढलीं कीं आण्याआण्यांनीं पैसे वाढत्या प्रमाणांत बँकेंत येतात; रोजच सगळे लोक पैसे काढून नेत नाहींत त्यामुळें अनुभवानें साधारण किती पैसा व्याजाशिवाय आपल्याला वापरायला मिळतो याची कल्पना थोड्याच दिवसांत बँकस येते. हे बिनव्याजी पैसे लहानशा बँकेंत देखील २० ते २५ हजारापर्यंत सहज जाऊं शकतात ! मग मोठ्या बँकांस १ ते २ लाख कां मिळणार नाहींत ? कायद्याच्या दृष्टीनें कोणत्याहि बँकेस ही सुरू करतां यावी असें वाटतें.

बचत योजनेस भिषि पद्धति पोषक असल्यानें सरकारनें व बँकेंतील अधिकारी वर्गानें याचा अधिक साधकबाधक रीतीनें विचार करावा. योग्य वाटल्यास रिझर्व्ह बँकेनें सर्व बँकांस आपल्या रोजच्या व्यवहारांत ती चालूं करण्याबद्दल जरूर ती शिफारस करावी अशी आग्रहाची विनंति आहे.

( 'व्यापार-उद्योग' एप्रिल, १९५१ )

# दि भारत इंडस्ट्रियल बँक लि., पुणें

—: शाखा :—

( १ ) पुणें कँटोन्मेंट ( २ ) बारामती ( ३ ) लोणावळें ( ४ ) बेलापूर रोड ( श्रीरामपूर ) ( ५ ) ओझार ( तांबट ). जि. नाशिक ( ६ ) खोपोली ( जि. कुलाबा )

## दि. ३१ डिसेंबर १९५० रोजींची परिस्थिति दाखविणारीं संक्षिप्त पत्रकें

### ताळेबंद

#### मांडवल व देणें

| | रु. आ. पै |
|---|---|
| मागणी केलेलें व वसूल झालेलें मांडवल | ३,९९,३८५–०–० |
| मागापोटीं आगाऊ भरलेलें | २९०–०–० |
| रिझर्व्ह फंड | ४१,१००–०–० |
| कॉंटिन्जन्सी फंड | ७,५००–०–० |
| डिपी. फंड फॉर इन्व्हेस्टमेंट | २,०००–०–० |
| ठेवी व इतर खातीं | ५३,७१,६७६–९–३ |
| इतर बँकांकडून घेतलेले | २,२६,७१८–१५–२ |
| बिल्स पेएबल वसुलीसाठीं आलेलीं बिलें ( येणेंकडे दाखविल्याप्रमाणें ) | १८,३३२–७–६ |
| बिल्स फॉर कलेक्शन ( येणेंकडे दाखविल्याप्रमाणें ) | २,४०,६३६–९–९ |
| इतर लायबिलिटीज<br>किरकोळ देणीं १५,९७४–०–११<br>देणें व्याज ३३,९९०–१२–६<br>मागणी न केलेलें डिव्हिडंड १,९४६–१२–९<br>रिबेट ऑन बिल्स डिस्कौंटेड ३४५–६–० | ५२,२५७–०–२ |
| नफा तोटा खातें–<br>मागील ताळेबंदांतून पुढें ओढलेली रक्कम ५११–७–३<br>१९५० सालचा निव्वळ नफा ( ज्यावर इन्कम टॅक्स देणेंचा, असा ) २५,३५४–११–९ | २५,८६६–३–० |
| एकूण | ६३,९५,७६२–१२–१० |

#### जिंदगी व येणें

| | रु. आ. पै |
|---|---|
| रोख व रिझर्व्ह बँकेकडे असलेली शिल्लक | ४,४९,७२३–९–५ |
| बँकांकडील शिल्लक–चालू खात्यांत | ५,३५,९८७–१२–४ |
| बिल्स डिस्कौंटेड व परचेसड | ३,५१,५९८–०–० |
| इनव्हेस्टमेंट्स ( खरेदी किंमत )<br>प्रांतिक व मध्यवर्ती सरकारांचे कर्जरोखे व ट्रस्टी सिक्युरिटीज, ट्रेझरी बिल्स व शेअर्स ( बाजारभावानें किंमत २१,०८,२५२–८–०) | २१,९८,३३०–८–० |
| कर्जें, कॅश क्रेडिट्स व ओव्हरड्राफ्टस | २३,९०५२१–९–७ |
| वसुलीसाठीं पाठविलेलीं बिलें ( देणेंकडे दाखविलेप्रमाणें ) | २,४०,६३६–९–९ |
| इमारतीची जागा | ७८,८५३–१०–० |
| फर्निचर व फिक्चर्स ( वजा घसारा ) | २२,६८०–०–० |
| इतर असेट्स<br>संड्री असेटस, सरकारी रोख्यांवर साचलेलें व्याज, व्याज घेतांना कापलेला इनकम टॅक्स, इनकम टॅक्स आगाऊ दिलेला, छापील कागद, लायब्ररी, स्टँप्स, स्टाफला ॲडव्हॉन्स, लिक्विडेशनमधील बँकेकडून येणें, ब्रँच ॲडजस्टमेंटस | १,२७,४३१–१–९ |
| एकूण | ६३,९५,७६२–१२–१० |

### नफातोटा पत्रक

| खर्च | रु. आ. पै | जमा ( संशयित व बुडीत कर्जासाठीं चालू सालीं केलेली तरतूद वजा करून ) | रु. आ. पै |
|---|---|---|---|
| ठेवींवर दिलेलें व्याज | १,०९,८५६–४–१ | व्याज आणि डिस्कौंट | २,५६,२९०–८–१ |
| पगार व भत्ते वगैरे | ७४,१७५–७–६ | | |
| डायरेक्टरांची फी व भत्ते | २,९५०–०–० | कमिशन, हुंडणावळ व ब्रोकरेज | ११,९८०–०–८ |
| प्रॉव्हिडंट फंड | २,१६७–३–० | | |
| ऑफिसभाडें, कर, विमे, दिवाबत्ती वगैरे | ७,५३२–३–३ | भाडें | १,२४९–४–० |
| लॉ चार्जेस | १,१३७–४–३ | | |
| टपाल, तार व स्टँप्स | ४,४१९–८–० | ट्रान्स्फर फीज | ५७–४–० |
| ऑडिट फी | ५००–०–० | | |
| मालमत्तेवरील घसारा | ५०७–१५–० | इतर | ८,०५०–१२–१ |
| मालमत्तेस डागडुजी | १६०–०–० | | |
| स्टेशनरी, छपाई, जाहिरात, इ. | ६,४२८–१–० | | |
| इतर खर्च | ४२,३३९–३–० | | |
| निव्वळ नफा ( ज्यावर इनकमटॅक्स देणेंचा असा ) | २५,३५४–११–९ | | |
| एकूण | २,७७,६२७–१२–१० | एकूण | २,७७,६२७–१२–१० |

एम. के. तेरणीकर, अकौंटंट. एन. एन. क्षीरसागर, आर. वी. साळवेकर, मॅनेजिंग डायरेक्टर्स. वी. वी. वाळवेकर, अध्यक्ष. के. पी. जोशी, उपाध्यक्ष.

खरे अँड कं. चार्टर्ड अकौंटंट्स

सौ. इंदुमतीबाई फडके, बी. पी. केळकर, आर. बी. गिरमे, के. एम. महाजन, आर. पी. दामोदर, एच. बी. गिरमे } संचालक

## दि बँक ऑफ कराड लि., कराड

### पहिल्या पांच वर्षांतील कामगिरी

बँकेच्या कामास मि. चैत्र शु॥ १ शके १८६८ या शुभदिनीं सुरुवात करणेंत आली. व्यापारास व उद्योगधंद्यास उत्तेजन देण्याकरतां बँक काढण्याची कल्पना प्रथमतः कै. श्रीधर विठ्ठल ऊर्फ काकासो सुपनेकर यांनीं सन १९४४ मध्यें पुढें मांडली. त्यांचेबरोबर मुंबईचे शेठ द्वारकादास हरिदास वसारिया हेहि होते व त्यांनींहि अशा तऱ्हेची बँक काढल्यास ती चांगली चालेल असें आपलें मत दिलें. पांच लाख रुपये भांडवलाची बँक रजिस्टर करणेस व दोन लाख पन्नास हजार रुपये दर्शनी किंमतीचे शेअर्स विकणेस १९४६ मध्यें परवानगी मिळाली. ते सर्व शेअर्स एक वर्षाचे अवधींत खपले व बँकेनें ठरविल्याप्रमाणें खपलेल्या शेअर्सचे निम्में भांडवल प्रत्यक्ष जमाहि झालें. शेअर्सची मागणी जास्त येऊं लागल्यामुळें बाकीचे शेअर्स विक्रीस काढणेबद्दल कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूज, नवी दिल्ली यांचेकडे परवानगी मागण्यांत आली व आज तारीख अखेर बँकेचे ४३,१० शेअर्स खपलेले आहेत. आतां फक्त ६९० शेअर्स विक्री करणेचे राहिले आहेत. आज तारखेस बँकेचे एकंदर ४१० शेअरहोल्डर्स (भागीदार) आहेत. बँकेचे शेअर्स खपविण्याकरितां कोणास कांहींहि ब्रोकरेज अथवा कमिशन द्यावें लागलें नाहीं.

### सातारा शाखा

सातारा येथें ता. २६-२-१९५१ पासून या बँकेची पहिली शाखा उघडण्यांत आली आहे. तारीख २५-३-५१ अखेर या शाखेंत १९,६०० रुपयांच्या ठेवी आल्या आहेत. तेथील एकूण ठेवीदारांची संख्या ३७ झाली आहे. परगांवचे बँकेवर चेक देणें व इतर ठिकाणच्या बँकांवर काढलेले चेक वसूल करणें, हुंडी व्यवहार व रसीदीसंबंधींचे व्यवहार एवढ्या अल्प मुदतींत प्रत्यक्षपणें करण्यापर्यंत त्या शाखेची प्रगति झाली आहे. शाखेच्या सल्लागार मंडळाचे अध्यक्ष श्री. रामकृष्णसा सितारामसा पवार, म्युनिसिपॅलिटीचे प्रेसिडेंट, हे आहेत.

### श्री. शिराळकर ह्यांची कामगिरी

श्री. विष्णु दत्तात्रय शिराळकर हे बँकेचे सुरवातीपासून मॅनेजिंग डायरेक्टर होते. सन १९४९ च्या बँक्स ॲक्टप्रमाणें त्यांना मॅनेजिंग डायरेक्टर राहातां येईना म्हणून त्यांनीं आपल्या त्या जागेचा राजीनामा १९४९ सालीं दिला. मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून त्यांना मेहनताना मंजूर केला असतांनाहि त्यांनीं कांहीं मेहनताना घेतला नाहीं, ही विशेष उल्लेखनीय गोष्ट आहे.

### १९५० मधील काम

१९५० सालीं बँकेस २४,३३३ रु. निव्वळ नफा झाला, त्यांत मागील शिलकी नफा मिळविल्यावर नफा-वाटणीस २५,७०० रु. येतात. रिझर्व्ह फंड ५,००० रु., सि. फंड २,००० रु., जनरल रिझर्व्ह १,५०० रु., डिव्हिडंड (४% करमाफ) ८,६०० रु., कराची तरतूद ७,३०० रु. अशी नफ्याची वाटणी करून १,३०० रु. पुढील वर्षांच्या हिशेबांत ओढण्यांत आले.

बँकेचे मॅनेजर श्री. संडकर ह्यांनीं चांगलें काम केलें व त्यांना सर्व स्टाफनीं चांगली मदत केली, असें अहवालांत म्हटलें आहे. बँकेकडील ठेवींत सालोसाल वाढ होत गेली आहे. सरकारी रोख्यांतील गुंतवणूक पुष्कळच वाढली आहे आणि तिचें प्रमाण ४५.९ % झालें आहे. दि डेक्कन बँक्स असोसिएशनच्या कार्यकारी मंडळावर कऱ्हाड बँकेस जागा मिळाली आहे.

(चेअरमन : लक्ष्मण महादेव देशपांडे, एक्स एम. एल. सी. मॅनेजर : महादेव विनायक संडकर)

| साल | वसूल झालेलें भांडवल | रिझर्व व इतर फंडस् | एकूण ठेवी | कर्जें, हुंडीवरील रकम धरून | इन्व्हेस्टमेंटस् | हातांतील व बँकांकडील शिल्लक | निव्वळ नफा | डिव्हिडंड |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४६ | १,२५,००० | | १०,८०,२०० | ६,४३.००० | ४,८४,८०० | ७८,३०० | ४,०२४ | — |
| १९४७ | १,२५,००० | १,००० | १५,७६,००० | १०,५३,८०० | ४,४४,८०० | २,९०,६०० | २०,२५० | ४% |
| १९४८ | २,०५,००० | ६,००० | १६,०१,२०० | ९,०२,३२५ | ४,४५,००० | ५,०१,२०० | २२,०५५ | ४% |
| १९४९ | २,०८,६२५ | १८,००० | १६,२५,००० | ८,७०,५१० | ५,१४,९०० | ५,०४,४०० | २४,३४७ | ४% |
| १९५० | २,१४,७७५ | २४,००० | १६,२९,५०० | ८,९७,७४० | ७,५२,२०० | २,६६,५०० | २४,३६६ | ४% |

### एका मिनिटांतील प्रचंड घडामोडी

"आलोंच एका मिनिटांत" असें आपण पुष्कळ वेळां म्हणतों, परंतु एका मिनिटांत किती प्रचंड घडामोडी होत असतात ह्याची आपल्याला कल्पनाहि नसते. एका मिनिटांत ९० मुलें जन्माला येतील आणि ७६ लोक मरण पावतील. त्या वेळांत जगांतील धूम्रपानबहाद्दर ३ टन तंबाखूचा धूर करतील आणि ६,००,००० पेले चहा अथवा कॉफी लोकांच्या घशांत जाईल. दर मिनिटास आपण २,००० टन कोळसा व तितकेंच तेल जाळतों. प्रत्येक सेकंदागणिक ५० टन मीठ खपतें. दर मिनिटास ३,५०० गुन्हे होतात, आणि २,००० गुन्हेगार सापडतात. प्रत्येक मिनिटांत एकादी आत्महत्या तरी होते, नाहीं तर खून तरी होतो. दर मिनिटागणिक २५,००,००० पत्रें पोस्टांत पडतात. एका मिनिटांत पृथ्वी सूर्याभोंवतीच्या प्रवासाचे १,००० मैल पुरी करते.

### बँकेच्या नोकरांना कपडे बक्षीस

लंडनमधील एका प्रसिद्ध बँकेच्या चालकांनीं आपल्या प्रत्येक स्त्री व पुरुष नोकरास नवा सूट किंवा पोषाक बक्षीस दिला आहे. त्यासाठीं बँकेस २,००० पौंड खर्च आला. पुरुष नोकरास १२ पौंड व स्त्री नोकरास ११ पौंड, १० शिलिंग एवढी रक्कम बँकेकडून मिळण्याचा अधिकार देणाऱ्या चिठ्ठ्या देण्यांत आल्या, त्या दुकानदारांना देऊन त्यांचे मोबदल्यांत कपडे घ्यावयाचे, अशी योजना होती.

**कृत्रिम रेशमाला संरक्षण**— कृत्रिम रेशमापासून केलेल्या आणि कृत्रिम रेशीम व कापसाचें सूत ह्यांच्यापासून बनविण्यांत आलेल्या कापडाच्या धंद्याला दिलेलें संरक्षण चालू ठेवावें, अशी शिफारस टॅरिफ बोर्डानें केली होती. ती मान्य करून मध्यवर्ती सरकारनें संरक्षणाची मुदत दोन वर्षांनीं वाढविली आहे.

## कंपन्या स्वतःचे शेअस विकत घेऊंच शकत नाहींत

### श्री. अधिकारी ह्यांच्या प्रश्नाचा खुलासा

संपादक, " अर्थ " यांसी स. नमस्कार वि.

१८ एप्रिलचे " अर्था " मध्यें १२८ पानावर आपण श्री. गो. गो. अधिकारी यांचें पत्र छापलें आहे. " बँकांनीं व तज्ज्ञांनीं याचा विचार करावा " अशी त्यांनीं विनंति केली. त्याप्रमाणें २५ तारखच अंकांत कोणी तज्ज्ञ किंवा बँकर त्या पत्रास उत्तर देतील अशी अपेक्षा केली, परंतु निराशा झाली.

कंपनीला स्वतःचे शेअर्स खरेदी करतां येत नाहींत. कंपनी-कायद्याचें ५४ ए कलम पहा. बँकांनाही तो नियम लागू असणारच. अशी खरेदी म्हणजे " भांडवल " कमी करणें असा अर्थ होतो, व कायद्यानें असें करतां येत नाहीं. कंपनीचे व्यवस्थापक कोणी शेअर्स विकत घेणारे असल्यास, शेअर्स विकणारा व असा घेणारा यांची रुजवात घालूं शकतील. कायद्यानें नव्हे, सौजन्यानें. परंतु तशी त्यांचेवर जबाबदारी नाहीं.

शेअर बाजारांत, सर्व शेअर्समध्यें व्यापार–व्यवहार होत नाहींत. कॅशसेलस् कोणी ख्यातनाम ब्रोकर्स करूं शकतील. परंतु ज्या कंपन्या ( बँक ही कंपनीच असते ) लहान आहेत, अगर ज्या कंपनीची पत उत्तम नाहीं अशा कंपन्याच्या शेअर्सना नेहमीं मोठें गिऱ्हाईक नसतें व त्यांचे शेअर्स विकणें कठीण जाते.

पुष्कळ लोकांना, कायद्या माहीत नसतो, कंपन्यांचा बॅलन्सशीट कसा पहावा हें ते जाणत नाहींत, व प्रास्पेक्टसही नीट बघूं शकत नाहींत; ब्रोकर्सचे गोड बोलण्यावर व त्यानें केलेल्या ( जपून केलेल्या ) भावी उज्वल दशा येईल व भरपूर व्याज मिळेल या आशेवर विसंबून पैसे गुंतवितात, व अडचणींच्या वेळीं असा पैसा सुटा करणें अशक्य असल्यामुळें अडचणींत येतात. श्री. अधिकारी यांचे मित्रानें पैसे गुंतविले ती बँक सुस्थितींत असूं शकेल, तिचे व्यवहार चोख असतील, तथापि ती बँक आपले शेअर्स कायद्यामुळें स्वतः विकत घेऊं शकणारच नाहीं. परंतु पैसे गुंतवितांना, पुढेंमागें अडचण आल्यास शेअर्स विकतां येतील कां नाहीं हा विचार पैसे गुंतविण्याचे वेळींच करावयास पाहिजे. त्यांनीं एखाद्या तज्ज्ञाचा सल्ला घ्यावा, किंवा उत्तम बँक मॅनेजरला विचारणा करावी. बहुतेक बँक मॅनेजर जबाबदारीनें ( स्वतःला बांधून न घेतां ) सल्ला देतील असें वाटतें.

हा प्रश्न–पैसे शेअर्समध्यें गुंतविण्याला–जरा कठीण आहे. पण " प्रॉस्पेक्टस " व " बॅलन्सशीट " समजणारे तज्ज्ञ सल्ला देऊं शकतील. असा सल्ला घेऊन, उघड्या डोळ्यांनीं, शेअर्समधें पैसे गुंतवावे. कळावें.

मुंबई ४ आपला

२८–४–५१ ग. कृ. चितळे.

---

### पेटंटस् व डिझाइन्स संबंधीं कामें

लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें, ह्या संस्थेच्या सहाय्यानें पेटन्टस् व डिझाइन्स नोंदण्याचें काम करीत असलेले श्री. स. वा. दातार, बी. एस्सी., एलएल् बी. वकील, ७१ बुधवार, पुणें २ हे लवकरच पेटन्टचे कामानिमित्त कलकत्त्यास पेटन्ट कचेरींत जाणार आहेत. तरी ज्यां कोणास त्यांच्याकडून पेटन्टस् व डिझाइन्स यासंबंधांत कांहीं काम करवून घ्यावयाचें असेल, त्यांनीं फुले मंडईवरील संग्रहालय कचेरींत दिनांक ५–५–१९५१ अखेर त्यासंबंधांची माहिती आणून द्यावी.

## बँक नोकरांचे सध्याचे पगार तूर्त चालू रहाणार

### नवें लवादमंडळ : तडजोडीचाहि प्रयत्न

३१ जुलै, १९५० चा औद्योगिक लवादमंडळाचा बँकां-संबंधींचा निवाडा सुप्रीम कोर्टानें गेल्या महिन्यांत बेकायदा ठरविला. म्हणून नवीन लवादमंडळ नेमणारें एक बिल लवकरच पार्लमेंटांत मांडण्यांत येईल. सुप्रीम कोर्टाच्या निवाड्यापूर्वी, १ एप्रिल रोजीं नोकरवर्गास मिळणारे पगार व सवलती तूर्त चालू राहतील. नवें लवादमंडळ जरूर तर त्यांत मागाहून बदल करूं शकेल. पगाराच्या श्रेणी, महागाई भत्ता, घरभाडें, इत्यादि बाबी नव्या लवादमंडळाकडे निवाड्यासाठीं सोपविल्या जातील; ज्या बाबी सोपविल्या जाणार नाहींत अशांच्या निकालासाठीं एक कन्सिलिएशन ( तडजोड ) बोर्ड नेमण्याचा सरकारचा विचार आहे. त्यापूर्वी बँका व त्यांचे नोकर ह्यांच्या प्रतिनिधींची एक बैठक बोलाविण्यांत येईल. कन्सिलिएशन बोर्डावर रिझर्व्ह बँकेचा प्रतिनिधी घेतला जाईल. ज्या मुद्यांवर तडजोड होऊं शकणार नाहीं, असे मुद्दे लवादमंडळाकडे सोंपविले जातीलच.

---

## विजेचीं घड्याळें सध्यां मागें कां पडतात ?

### टाटा कंपनीनें ' फ्रीक्वन्सी ' कमी केली.

मुंबई राज्यांतील विजेवर चालणारीं घड्याळें हल्लीं हळू चालून दररोज कांहीं मिनिटें मागें पडत आहेत. गेल्या आठवड्यापासून असें होऊं लागलें आहे. त्याचें शास्त्रीय कारण असें आहे, कीं टाटा कंपनीच्या विजेची ' फ्रीक्वन्सी ' नेहेमी दर सेकंदास ५० सायकल्स असते ती विजेच्या पुरवठ्यावर ताण पडण्याच्या वेळीं ४९ सायकल्स करण्यांत येते. चोला पॉवर हाउसमध्यें निर्माण होणारी वीज रेल्वेला अपुरी पडत असल्यानें टाटांची वीज ज्यास्त प्रमाणांत वापरली जात आहे. कांहीं गिऱ्हाइकांना दिवसाचे कांहीं तास वीज अजिबात बंद करण्याऐवजीं, विजेचीं फ्रीक्वन्सी ५० ऐवजीं ४९ सायकल्स करणें वीज कंपनीला श्रेयस्कर वाटत आहे. ह्यामुळें ४९ सायकल्सच्या अल्टरनेटिंग करंटवर २४ तास चालणारें विजेचें घड्याळ दररोज सुमारें २८·८ मिनिटें मागें पडेल.

---

## श्री. काळे यांची सेवानिवृत्ति

पुणें येथील आर्यभूषण आणि ज्ञानप्रकाश मुद्रणालयांतील प्रमुख मुद्रित–तपासनीस श्री. रामकृष्ण जनार्दन काळे हे दि. १-५-५१ पासून वृद्धापकालामुळें ४२ वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचे छापखान्यांतील सहकारी व मित्र ह्यांनीं दि. २९ रोजीं त्यांचा सत्कार करून त्यांना प्रेमाचा निरोप दिला. दि. ३०।४।५१ रोजीं सायंकाळीं मुद्रणालयांतील यंत्रविभागातर्फेंहि त्यांचा सत्कार करण्यांत आला. श्री. काळे हे सेवानिवृत्तीनंतर कोंकणांत आपल्या गांवीं कायम राहण्यासाठीं लवकरच जाणार आहेत.

---

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गानिवास ', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.